# महाराष्ट्र विधानपरिषद
## दिवसाच्या कामकाजाचा क्रम
## मंगळवार, दिनांक २६ मार्च, २०१३.
## (सकाळी १०.०० ते ११.०० वाजेपर्यंत)

**(सोमवार, दिनांक २५ मार्च, २०१३ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला परंतु पुढे ढकलण्यात आलेला म.वि.प.नियम २६० अन्वये प्रस्ताव - चर्चा व मंत्र्यांचे उत्तर)**

**सर्वश्री. विनोद तावडे**, दिवाकर रावते, पांडुरंग फुंडकर, रामदास कदम, जयंत पाटील, चंद्रकांत पाटील, डॉ. दिपक सावंत, श्रीमती शोभाताई फडणवीस, डॉ. नीलम गोऱ्हे, सर्वश्री. रामनाथ मोते, सुमंतराव गायकवाड, ॲड. आशिष शेलार, ॲड. अनिल परब, डॉ.रणजित पाटील, सर्वश्री. नागो गाणार, भगवान साळुंखे **वि.प.स. यांचा म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव -**

"महाराष्ट्रामध्ये मुंबई, ठाणे, पुणे, नाशिक, औरंगाबाद, नागपूर इत्यादी शहरात सोनसाखळी चोऱ्या, अपहरण, चोऱ्या, खून, दंगली, इत्यादींच्या प्रमाणात झालेली लक्षणीय वाढ, मुंबईवरील दहशतवादी हल्ल्याचा मास्टर माईंड हाफिज सईद याचे चिथावणीखोर व धार्मिक भावना भडकाविणाऱ्या भाषणाचे ध्वनिमुद्रण आणि दृकश्राव्य फितीचा मोबाईलद्वारे धुळे येथे मोठ्या प्रमाणात प्रसार करण्यात आल्याने दिनांक ६ जानेवारी, २०१३ रोजी धुळे येथील मछली बाजार येथे दंगल उसळणे, या दंगलीत दंगेखोरांकडे तीक्ष्ण धारधार शस्त्रास्त्रे व विशिष्ट प्रकारचे ॲसिड सापडणे, आंध्र प्रदेश राज्यातील एम.आय.एम. या पक्षाचे लोकप्रतिनिधी अकबरुद्दीन ओवेसी यांनी नांदेड येथे केलेल्या प्रक्षोभक भाषणाप्रकरणी संबंधीत पोलीस स्थानकामार्फत अद्यापी कोणतीही कारवाई केलेली नसणे, एकूण गुन्हेगारीत वाढ झालेली असताना पोलीसांच्या व विधी व न्याय खात्याच्या संशयास्पद भूमिकेमुळे गुन्हेगारांना शिक्षा होण्याचे प्रमाण गतवर्षी केवळ ९ टक्के असताना या वर्षी ते ९ टक्क्याच्याही खाली आलेले असणे, शिक्षा झालेले अनेक आरोपी पॅरोलच्या नियमांचे उल्लंघन करून फरार होवून गंभीर गुन्हे करीत असल्याचे निदर्शनास येणे, दिल्ली येथील निर्भया प्रकरण ताजे असताना मुंबईत भर अधिवेशन कालावधीत म्हणजेच दिनांक १५ मार्च, २०१३ व दिनांक १६ मार्च, २०१३ अनुक्रमे विलेपार्ले आणि माटुंगा येथे सामुहिक बलात्काराच्या घडलेल्या गंभीर घटना, भंडारा जिल्ह्यात तीन अल्पवयीन मुलींवर बलात्कार करून त्यांचा खून करण्यात आल्याप्रकरणी गृह खात्याच्या व फॉरेन्सिक खात्याच्या तपासणी अहवालात नसलेली एकवाक्यता, राज्यात महिला, अल्पवयीन मुली, दलित व बालकांवरील अत्याचारात वाढ होवून यामध्ये पुरोगामी महाराष्ट्राने मागास राज्यांनाही मागे टाकणे, नवी मुंबईतील सुनिल लाहोरिया खून प्रकरण, संध्या सिंग खून प्रकरण,

सिडकोतील लिपिक श्री.अतुल म्हात्रे खून प्रकरणांसह अनेक गंभीर खून प्रकरणांचा तपास लावण्यास गृह खात्यास आलेले अपयश, डान्सबार बंद करण्याची घोषणा करुन देखील समाज शाखेच्या अधिकाऱ्यांच्या संगनमताने मुंबई महानगरक्षेत्रात डान्सबार सुरु असणे, सायबर गुन्ह्यांच्या माध्यमातून आर्थिक फसवणूक करण्याच्या घटनेत देखील वाढ झालेली असणे, मुंबई शहरातील खाजगी आस्थापनांवर तैनात असलेल्या २१ खाजगी सुरक्षारक्षकांकडून दिनांक १० जानेवारी, २०१३ रोजी बेकायदेशीर शस्त्रास्त्रांचा जप्त केलेला साठा, २६/११ च्या हल्ल्यानंतर सीसीटिव्ही यंत्रणा बसविण्याची घोषणा करुन देखील अद्यापपर्यंत सीसीटिव्ही यंत्रणा बसविलेली नसणे, एकूणच राम प्रधान समितीच्या शिफारशींच्या अंमलबजावणीबाबत शासनाची असलेली उदासिन भूमिका, यासर्व बाबींमुळे पोलीस दलाबाबत संपूर्ण महाराष्ट्रातील जनतेमध्ये पसरलेला तीव्र असंतोष व याबाबत शासनाने तातडीने करावयाची उपाययोजना विचारात घेण्यात यावी."

## (सकाळी ११.१५ वाजता)

**एक : प्रश्नोत्तरे.**

**दोन : म.वि.प.नियम ९३ अन्वये सूचना - (असल्यास).**

**तीन : म.वि.प. नियम ९३ अन्वये निवेदन - (असल्यास).**

**चार : लक्षवेधी सूचना-(म.वि.प. नियम १०१ अन्वये) -**

**(१) (शुक्रवार, दिनांक २२ मार्च, २०१३ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेली परंतु पुढे ढकलण्यात आलेली लक्षवेधी सूचना )**

**ॲड. अनिल परब वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबींकडे **गृहमंत्र्यांचे** लक्ष वेधतील **:-**

" राज्यात होणारी पोलीस भरती ही 'सरळसेवा भरती प्रक्रिया' व 'पोलीस खात्यात काम करणाऱ्या अधिकारी-कर्मचाऱ्यांच्या मुलांची भरती' अशा दोन प्रकारे करण्यात येत असतांना सन २००३ नंतर सरळसेवा भरती प्रक्रिया झाली, परंतु आतापर्यंत पोलीस खात्यातील अधिकारी-कर्मचाऱ्यांच्या मुलांची भरती प्रक्रिया करण्यात न येणे, यामुळे राज्यातील पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या मुलांमध्ये निर्माण झालेले निराशेचे वातावरण, ज्याप्रमाणे सरळसेवा भरती प्रक्रिया करण्यात येते, त्याप्रमाणे पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या मुलांकरिता करण्यात येणारी भरती शासनाने पुन्हा सुरु करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने केलेली व करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

(२) **सर्वश्री. राजेंद्र जैन,** हेमंत टकले, विक्रम काळे, सतीश चव्हाण **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबींकडे **गृहमंत्र्यांचे** लक्ष वेधतील **:-**

"शासनाच्या गृह मंत्रालयाने ४ फेब्रुवारी, २०१३ रोजी परिपत्रक काढून गोंदिया आणि भंडारा जिल्ह्यातील एकूण ७ तालुक्यांना नक्षलप्रभावीत यादीतून वगळण्याचा घेण्यात आलेला निर्णय, यामध्ये गोंदिया जिल्ह्यातील गोंदिया, गोरेगांव, तिरोडा, आमगांव असे ४ तालुके आणि भंडारा जिल्ह्यातील साकोली, लाखनी, लाखांदूर अशा ३ तालुक्यांचा समावेश असणे, मध्यप्रदेशातील अति नक्षलप्रभावीत जिल्हे सदर दोन्ही जिल्ह्यांना लागून असणे, ज्यामुळे नक्षलवाद्यांची दोन्ही जिल्ह्यातील सर्व तालुक्यांमध्ये सतत आवागमन सुरु असणे, त्यामुळे दोन्ही जिल्ह्यातील जनता नक्षल कारवायांमुळे त्रस्त असताना सदर तालुके नक्षलग्रस्त यादीतून वगळण्याचा घेतलेला निर्णय, यामुळे नागरिकांमध्ये पसरलेला असंतोष आणि असुरक्षिततेची भावना, यावर शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना, यावर शासनाची प्रतिक्रिया."

(३) **श्री. दिवाकर रावते वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबींकडे **जलसंपदा (कृष्णा खोरे व पाटबंधारे महामंडळ वगळून) मंत्र्यांचे** लक्ष वेधतील **:-**

"ठाणे जिल्ह्यातील जलसंपदा विभागाच्या सुर्या प्रकल्पातील निकृष्ट बांधकामे, प्रत्यक्ष काम न करता बोगस बिले तयार करणे, बेकायदेशीर कामाचा वाढीव खर्च दाखविणे, इत्यादीबाबत चौकशी करण्यासाठी ऑगस्ट, २०१० मध्ये नेमलेल्या जलसंपदा विभागाचे सह सचिव समितीने सखोल चौकशी करणे, या चौकशीमध्ये राज्य शासनाचे सुमोर अडीच कोटी रुपयांचे नुकसान झाल्याचे आढळून येणे, या गैरव्यवहारात उपविभागीय अभियंता व शाखा अभियंता जबाबदार आढळणे, सन २०१० मध्ये नियुक्त केलेल्या चौकशी समितीच्या अहवालानुसार संबधित अधिकाऱ्यांकडून वसूलीची कोणतीही कारवाई अद्यापही न करणे, तसेच काम न करता देयकांची पूर्ण रक्कम घेणाऱ्या कंत्राटदारविरुध्द कोणतीही कारवाई न करणे, त्यातच, प्रकल्पाच्या सिंचन क्षेत्रातील बेकायदा औद्योगिक कारखाने व दगडखाण उद्योगांमुळे हे सिंचन क्षेत्र बाधित होत असणे, या सर्वच बाबतीत शासनाने तातडीने केलेली व करावयाची कार्यवाही."

(४) **श्री. मोहन जोशी वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबींकडे **उच्च व तंत्र शिक्षण मंत्र्यांचे** लक्ष वेधतील **:-**

"मागील वर्षी केंद्रशासनाच्या विज्ञान तंत्रज्ञान विभागाच्या डिपार्टमेंट ऑफ

बायोटेक्नॉलॉजी तर्फे पुणे विद्यापीठातील एसटीपी ला बिझनेस बायोटेक्नॉलॉजी इनक्युबेटर उभारण्यासाठी आलेला ३४ कोटी रुपये निधी पुणे विद्यापीठाची व्यवस्थान परिषद आणि सायन्स टेक्नॉलॉजी पार्क (एसटीपी) यांच्यातील वादामुळे परत जाणार असल्याचे नुकतेच निदर्शनास येणे, विद्यापीठाने सदर प्रकल्प सुरु करण्यास मान्यता देताना व प्रकल्पाकरिता जागा देताना सदरहू प्रकल्पाची जागा फक्त प्रकल्पाच्या वापरासाठी असावी व त्याची मालकी विद्यापीठाकडेच असावी, पुणे विद्यापीठ व टेक्नॉलॉजी पार्क यांची संयुक्त व्यवस्थापन समिती गठीत करण्यात यावी, प्रकल्पाचे संचालक म्हणून विद्यापीठाची व्यक्ती असावी, प्रकल्प संपल्यानंतर साहित्य, यंत्रे व उपकरणांची मालकी विद्यापीठाकडे असावी, सायन्स आणि टेक्नॉलॉजी पार्कचे नियामक मंडळाचे सदस्य पदसिध्द असण्याबाबत घटनेत बदल करण्यात यावा, विद्यापीठाकडून कोणतीही आर्थिक मदत न देताही पुणे विद्यापीठ आणि सायन्स अँड टेक्नॉलॉजी पार्क यांनी नफा वाटण्याबाबत सामंजस्य करार करावा, अशा केंद्र शासनाला न पटणाऱ्या जाचक अटी लादल्याने हा प्रकल्प पूर्ण न होण्याची दाट शक्यता निर्माण होणे, राज्याच्या दृष्टीने अत्यंत महत्वाचा असलेला हा प्रकल्पच गुंडाळला जाण्याची व इतर राज्यात जाण्याची निर्माण झालेली शक्यता, याबाबत शासनाने तातडीने केलेली वा करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

(५) **डॉ. रणजित पाटील,** सर्वश्री. गोपीकिसन बाजोरिया, प्रवीण पोटे पाटील **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबींकडे **कामगार मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"राज्यातील ग्रामीण भागातील दारिद्रय रेषेखालील लाभार्थ्यांना महत्वपूर्ण ठरलेली राष्ट्रीय सुरक्षा विमा योजना (R.S.B.Y.) अमरावती विभागातील अकोला व वाशिम या जिल्ह्यामध्ये बंद असणे, राज्यातील राजीव गांधी जीवनदायी योजना लागु होण्यास विलंब होत असणे, अशापरिस्थितीत राष्ट्रीय सुरक्षा विमा योजनेस मुदत वाढ देवून निधी उपलब्ध करुन देण्याची आवश्यकता असणे, निधी अभावी सदर योजना बंद पडण्याच्या स्थितीत असून या योजनेस निधी उपलब्ध करुन दिल्यास रुग्णांची विशेषतः दारिद्र्य रेषेखालील रुग्णांची गैरसोय होणार नाही, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

**पाच : विशेष उल्लेख (असल्यास) - (म.वि.प. नियम १०१-अ अन्वये).**

## - मध्यंतर -

**सहा : सन २०१३-२०१४ च्या अर्थसंकल्पावर सर्वसाधारण चर्चा - (दुसरा दिवस).**

**सात : शासकीय विधेयके :-**

**(अ) विधानसभेने संमत केल्यास - विधेयक विचारात घेणे -**

सन २०१३ चे वि.स.वि. क्रमांक ४ - महाराष्ट्र विनियोजन (लेखानुदान) विधेयक, २०१३.

**(ब) विचार, खंडशः विचार व संमत करणे -**

सन २०१३ चे वि.प.वि. क्रमांक १ - महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) (सुधारणा) विधेयक, २०१३.

**आठ : म.वि.प.नियम २६० अन्वये प्रस्ताव -**

**सर्वश्री. हेमंत टकले,** सुभाष चव्हाण, अमरसिंह पंडीत, सतीश चव्हाण, प्रा.सुरेश नवले, सर्वश्री. एम.एम.शेख, अब्दुल्ला खान दुर्राणी, विक्रम काळे, कपिल पाटील, विनायकराव मेटे, राणा जगजितसिंह पाटील **वि.प.स. यांचा म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव -**

"सन १९७६ मध्ये पूर्ण झालेल्या औरंगाबाद जायकवाडी धरणाची क्षमता १०२ टीएमसी असणे, परंतु धरणाच्या वरील बाजूस ११५ टीएमसी पाणी अडविण्याची परवानगी आयोगाने दिलेली असतांनाही जागोजागी बंधारे व धरणे बांधून नियमबाह्य पध्दतीने १८५ टीएमसी पाणी अडविल्याने जायकवाडी संकल्पीत साठ्याच्या केवळ २ टक्के पाणी आले असणे, औरंगाबाद, बीड, जालना, परभणी या जिल्ह्यातील पेयजल सिंचन व उद्योग धंदे, शिवाय परळी औष्णिक विद्युत निर्मिती केंद्र जायकवाडीच्या पाण्यावरच अवलंबून असून मराठवाड्यातील जनता पाण्यासाठी हवालदिल झालेली असणे, जायकवाडी प्रकल्प धरण या खोऱ्यातील पाणी साठ्याची टक्केवारी ३५ टक्के असून संबंधित कायद्यातील तरतूदीनुसार जायकवाडीच्या वरील भागातील धरणांतून २७ अब्ज घनफूट पाणी सोडणे बंधनकारक असणे, कृष्णेचे २१ टीएमसी हक्काचे पाणी देण्यातही मराठवाड्यावर अन्याय झालेला असणे, तसेच मराठवाड्याच्या वाट्याला आलेल्या २५ टीएमसी पाण्यासाठी रु.४,८४५ कोटींची प्रशासकीय मान्यता दिलेली असून मागील ५ वर्षात यापैंकी रु.५३५ कोटींची तरतूद झालेली असणे, उर्वरित कामासाठी निधीची तरतूद त्वरीत करणे आवश्यक असणे, प्रत्यक्षात ७ टीएमसीचीच कामे सूरु असून, त्यात कृष्णा मराठवाडा सिंचन प्रकल्पाचा टप्पा नं.१ व कृष्णा भीमा स्थिरीकरण प्रकल्पाचा काही भाग असणे, हा प्रकल्प पूर्ण करणेसाठी ३३०० कोटी रुपयाची आवश्यकता असणे, गोदावरी खोऱ्यात नविन १८ टीएमसी पाणी साठवण्यास

परवानगी असणे, परंतु नवीन लघू प्रकल्पाला मान्यता मिळत नसल्याने अडचणी येत असणे, याबाबतीत शासनाने त्वरीत निर्णय घेणे आवश्यक असणे, याकरीता शासनाने त्वरीत करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया विचारात घेण्यात यावी."

**नऊ : अर्धा-तास चर्चा - म.वि.प.नियम ९२ अन्वये - (बैठकीच्या शेवटी)**

**(१) श्री.अमरसिंह पंडित, वि.प.स.**

"मराठवाड्यातील बीड, जालना व परभणी या जिल्ह्यातील गोदावरी नदीवर पूल बांधण्याबाबत" या विषयावरील श्री.सय्यद पाशा पटेल, माजी वि.प.स. यांचा तारांकित प्रश्न क्रमांक ३११५३ ला दिनांक १३ जुलै, २०१२ रोजी दिलेल्या उत्तरातून उद्‌भवणाऱ्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.

**(२) श्री.विक्रम काळे, वि.प.स.**

"राज्यातील तलाठी सज्जांसाठी जागा उपलब्ध करुन देणेबाबत" या विषयावरील श्री.विक्रम काळे, वि.प.स. यांचा तारांकित प्रश्न क्रमांक ३४८९१ ला दिनांक १४ डिसेंबर, २०१२ रोजी दिलेल्या उत्तरातून उद्‌भवणाऱ्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.

**विधान भवन,**
मुंबई,
दिनांक : २५ मार्च, २०१३.

**डॉ.अनंत कळसे,**
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानपरिषद.